**अलिबाग पोलीस ठाणे गु.र. नं. ५९/२०१८ मधील आरोपी क्र. ०१ ते ०३ च्या रिमांड रिपोर्टवरील एकत्रित आदेश**

आज सायं. ०५.१५ वाजता आरोपी क्र. ०१ अर्णब गोस्वामी यास त्याच्या वैद्यकीय तपासणीनंतर पुन्हा माझे समक्ष वैद्यकीय अहवालासह हजर करण्यात आले. या आरोपीने केलेल्या मारहाणीच्या आरोपात तथ्य आढळून न आल्यामुळे मी त्याचा रिमांड अहवाल विचारात घेत आहे.

०२. आरोपी क्र. ०२ व ०३ यांना सायं. ०८.१५ वाजता माझे समक्ष हजर करण्यात आले. त्यांनी पोलीसांविरुद्ध मारहाणीची कोणतीही तक्रार नसल्याचे सांगितले. या तिन्ही आरोपींच्या वकीलांनी त्यांचे प्रतिनिधीत्व केले.

०३. सहाय्यक सरकारी वकील श्री. महाकाळ, तपासी अंमलदार श्री. जे.ए. शेख हजर. आरोपींना भारतीय दंड विधान कलम ३०६ सह कलम ३४ मधील गुन्ह्याकामी हजर करण्यात आले. तपासी अंमलदार यांनी १४ दिवसांच्या पोलीस कोठडीची मागणी केली. केस डायरी, रिमांड पेपर्स आणि प्रथम खबरी अहवालाचे वाचन केले.

०४. सहाय्यक सरकारी वकील श्री. महाकाळ युक्तीवाद करतात की, दि. ०५/०५/२०१८ रोजी मौजे कावीर, ता. अलिबाग, जि. रायगड येथे मयत अन्वय मधुकर नाईक याने आत्महत्या केली. त्यापूर्वी त्याने आत्महत्या चिठ्ठी लिहून ठेवली होती. त्यामध्ये व्यवसायाच्या माध्यमातून आरोपींकडे असलेल्या कामाची रक्कम आरोपींकडून मयताला येणे बाकी होते. त्यामुळे मयत अन्वय नाईक याने वारंवार झालेल्या कामाचे पैसे मागूनही ते आरोपींनी मयताला परत केले नाहीत. तसेच त्यांच्याकडे इतर कंत्राटदार पैसे मिळविण्याकरीता तगादा लावत होते. त्यामुळे मयत अन्वय नाईक हा मानसिक तणावाखाली आला, हा तणाव असह्य झाल्याने त्याने आत्महत्या केली. याबाबतची फिर्याद व प्रथम माहिती अहवाल दि. ०५/०५/२०१८ रोजी फिर्यादी अक्षता अन्वय नाईक हिने दिली.

०५. सहा. सरकारी वकील पुढे म्हणतात की, याबाबत तपासकाम सुरु

होवून कोणताही पुरावा आढळून आला नाही म्हणून 'अ' फायनल असा अहवाल सादर करण्यात आला. तो मंजूर झाला. त्यांनतर फिर्यादी अक्षता नाईक हिने पुन्हा तक्रार केल्यामुळे त्याबाबत पुन्हा तपासकाम सुरु झाले. त्यामध्ये आरोपी क्र. ०१ ते ०३ विरुद्ध पुरावा आढळून आला. या संदर्भात अजूनही पुरावा गोळा करणेचे काम सुरु आहे. तरी संपूर्ण व सखोल चौकशीसाठी आरोपी क्र. ०१ ते ०३ ची एकत्रितपणे पोलीस कोठडी मिळणे आवश्यक असल्याचे ते म्हणतात. पोलीस कोठडीचे समर्थन करत असताना सहा. सरकारी वकील श्री. महाकाळ व तपासी अंमलदार श्री. शेख एकत्रितपणे सांगतात की, या तिन्ही आरोपींनी तपासकामात कोणतेही सहकार्य केलेले नाही. आरोपी क्र. ०१ ने अटक टाळण्यासाठी प्रयत्न केलेले आहेत. घटना घडल्यानंतर तिन्ही आरोपींमध्ये काय संभाषण झाले, कुठल्या कुठल्या इ-मेल्सची देवाण घेवाण झाली याबाबत सखोल तपास करणे आवश्यक आहे. ते पुढे म्हणतात की, आरोपींकडून त्यांच्या कंपन्यांचे मालकी व भागीदारी संबंधाने असणारे कागदपत्र व माहिती प्राप्त करुन घ्यावयाची आहे. मयत अन्वय नाईक यांनी त्यांच्या व्यावसायीक आस्थापनेचे काम अर्धवट सोडून दिल्याने इतर अन्य व्हेंडर्सकडून सदरचे काम करुन घेतलेले आहे. परंतु मयताला द्यावयाचे पैसे हे अद्यापपावेतो आरोपींनी दिलेले नाहीत. पूर्वी केलेल्या तपासामध्ये अशा व्हेंडर्सची नावे उघड झालेली नाहीत. त्यामुळे या मुद्यावर सखोल तपास करणे आवश्यक आहे. आरोपींची पोलीस कोठडी घेवून त्यांच्याकडून तपासकामासाठी आवश्यक असणारी कागदपत्रे जप्त करावयाची आहेत तसेच आरोपींकडून पैसे हस्तगत करण्यासाठी पोलीस कोठडीची आवश्यकता आहे, असेही ते म्हणतात. एकंदरीत रिमांड अहवालामध्ये एकूण १ ते १८ कारणे आरोपींच्या पोलीस कोठडीसाठी देण्यात आलेली आहेत. या सर्व कारणांच्या आधारावर सहा. सरकारी वकील श्री. महाकाळ व तपासी अंमलदार श्री. शेख हे आरोपी क्र. ०१ ते ०३ साठी पुढील १४ दिवसांकरीता पोलीस कोठडी मागतात.

०६. आरोपी क्र. ०१ तर्फे वकील श्री. अबदाद पोंडा यांनी दृकश्राव्य माध्यमातून युक्तीवाद केला की, आरोपीची अटक हीच मूळात बेकायदेशीर आहे. कोणत्याही कायद्याचा आधार नसताना सदरची अटक झालेली आहे. मूळात

तथाकथीत घटना ही सन २०१८ मध्ये घडलेली असून त्याबाबत 'अ' समरी अहवाल प्राप्त होवून तो न्यायालयाने मंजूर केलेला आहे. सदरचा न्यायालयाचा आदेश कोणत्याही वरीष्ठ न्यायालयाने रद्दबातल ठरविलेला नाही. या आदेशाला फिर्यादीने सुद्धा आव्हानित केलेले नाही. त्यामुळे सदरचा न्यायालयाने स्वीकारलेला 'अ' समरी अहवाल आजपावेतो अस्तित्वात आहे. अशा प्रकारे ज्या तपास कामामध्ये आरोपीविरुद्ध कोणताही पुरावा निष्पन्न झाला नाही अशी वस्तुस्थिती अस्तित्वात असताना आज सन २०20 मध्ये आरोपी क्र. ०१ ला कोणतेही समन्स किंवा नोटीस न देता अटक केली जाते, ही अटकच मूळात बेकायदेशीर आहे. तपासी अंमलदाराने सदरच्या पोलीस कोठडीबाबत कोणतेही ठोस कारण अहवालात नमूद केलेले नाही. ते पुढे युक्तीवाद करतात की, मा. वरीष्ठ न्यायालय यांच्या विविध निकालपत्रांच्या निर्देशाप्रमाणे आरोपीची पोलीस कोठडी केवळ अपवादात्मक परिस्थितीमध्ये देता येते. ते म्हणतात की, आरोपीची पोलीस कोठडी हा नियम नसून तो अपवाद आहे, त्यासाठी सबळ कारणे आवश्यक आहेत. याच मुद्यावर बोट ठेवून ते पुढे युक्तीवाद करतात की, आरोपीविरुद्ध कोणताही सबळ असा पुरावा तपासी अंमलदार यांनी न्यायालयासमोर आणलेला नाही. आरोपीला अटकपूर्व नोटीस न देण्याचे कोणतेही कारण त्यांनी नमूद केलेले नाही.

०७. ते पुढे म्हणतात की, सदरची आरोपी क्र. १ ची अटक ही केवळ पोलीसांनी त्यांच्या अधिकारांचा केलेला गैरवापर आहे. याही पलीकडे जावून ते असे म्हणतात की, आरोपी तो जे काही मयताला देणे लागत आहे ती रक्कम त्यांची हरकत कायम ठेवून (under protest) जमा करण्याची हमी देतो. मूळातच आरोपीला अटक करण्यासाठी कोणतेही कारण घडलेले नाही. तथाकथीत गुन्ह्याच्या तपासकामात आरोपी पूर्णपणे सहकार्य करत आहे. त्यामुळे आता पोलीस कोठडीची आवश्यकता नाही. या सर्व कायदेशीर मुद्यांवर ते न्यायालयाला विनंती करतात की त्याला न्यायालयीन कोठडी मिळावी.

०८. आरोपी क्र. १ च्या वरील युक्तीवादावर तपासी अंमलदार श्री. शेख उत्तर देतात की, पूर्वी केलेल्या तपसात काही त्रुटी राहिल्या होत्या, आरोपीने

वेळेवर पैसे दिले असते तर आज ही वेळ आली नसती, घटना घडल्यानंतर सर्व आरोपींनी एकत्रितपणे काय संभाषण केले याबाबत इ-मेल्स् त्यांना तपासावयाचे असून एकंदरीत आरोपी तपासकामात सहकार्य करत नसल्याने त्यांना आरोपींची पोलीस कोठडी हवी आहे.

०९. तपासी अंमलदारांच्या म्हणण्याला बगल देत आरोपी क्र. १ तर्फे वकील श्री. अबदाद पोंडा न्यायालयाचे मन वळवतात की, पूर्वी झालेल्या तपासकामात ज्या त्रुटी राहिलेल्या आहेत त्यासाठी या आरोपीला जबाबदार धरता येणार नाही. याला अनुसरुन पुढे ते प्रश्न करतात की, ज्या पूर्वाश्रमीच्या तपासी अंमलदार यांनी ज्या त्रुटी बाकी ठेवलेल्या आहेत त्यांच्याविरुद्ध काय कार्यवाही झाली. तपासी अंमलदारांच्या कथनावर बोट ठेवून ते म्हणतात की, यापूर्वी केलेला सर्व तपास आरोपीने पुरविलेल्या माहीतीवरुनच झालेला आहे, असे असताना आरोपी तपासकामात सहकार्य करत नाही असे म्हणताच येणार नाही. ते पुढे विनंती करतात की, या सर्व मुद्यांचा विचार करून आरोपी क्र. १ ला न्यायालयीन कोठडीत घ्यावे.

१०. आरोपी क्र. २ व ०३ साठी पोलीस कोठडी मागण्याचे कारण हे सारखेच आहे. ज्याप्रमाणे तपासी अंमलदार श्री. शेख यांना आरोपी क्र.१ ची पोलीस कोठडी हवी आहे त्याच कारणांसाठी आरोपी क्र. २ व ३ साठी सुद्धा हवी आहे. यातही हे म्हणतात की, मृत्यूपूर्व चिठ्ठीमध्ये मयत अन्वय नाईक यांनी आरोपी क्र. १ ते ३ यांची नावे प्रत्यक्षात लिहीलेली आहेत. तसेच मृत्युचे कारणही त्यांनी लिहीलेले आहे. त्यामुळे घटनेपूर्वी तिन्ही आरोपींची भेट झाली किंवा काय? याचा तपास घेणे आवश्यक असल्याचे ते म्हणतात. एकंदरीत तिन्ही आरोपींची पोलीस कोठडी ते मागतात.

११. आरोपी क्र. ०२ तर्फे वकील श्रीमती एन.ए. राउत यांनी युक्तीवाद केला की, या प्रकरणात 'अ' समरी अहवाल दाखल होवून तो मंजूर करण्यात आलेला आहे. सदरचा अहवाल कोणीही आव्हानित केलेला नाही. दि. ०५/०५/२०१८ पासून आजतागायत कोणताही पुरावा आलेला नाही. शिवाय,

०५/११/२०२०

तपासी अंमलदार यांनी म्हटल्याप्रमाणे केलेला तिसरा मजला तोडल्याची कोणतीही घटना घडलेली नाही. तसेच मयताचा व आरोपी क्र. ०२ चा कोणताही करार झालेला नाही. मयताला त्याच्या कामाचे पैसे या आधीच दिले गेलेले होते. अशा प्रकारे त्यांनी रु. ४,७८,३९,५२१/- अदा केलेले आहेत. त्यामुळे आरोपी क्र. ०२ ने यापूर्वीच अदा केलेल्या पैशांचे काय? असा सवाल त्या करतात. सदरच्या तथाकथीत घटनेचा संदर्भ घेवून त्या म्हणतात की, मयताकडे ठेकेदारांनी पैशांचा तगादा लावल्यामुळे मयताने आत्महत्या केल्याचा आरोप आहे तर या प्रकरणात खरे व्यथीत ठेकेदार व मजूरच आहेत. त्यामुळे मयताने आत्महत्या करण्याचा व त्यासाठी आरोपींना जबाबदार धरण्याचा काहीही संबंध नाही. या आरोपीला केवळ पैसे उकळण्यासाठी अटक झाल्याचेही त्या म्हणतात. पुढे त्या सवाल करतात की, सदरच्या पूर्वाश्रमीच्या तपासी अंमलदाराविरुद्ध कोणती कार्यवाही झाली निदान फिर्यादीने तरी त्यांच्याविरुद्ध तक्रार केली काय? हा केवळ दिवाणी वाद होता. त्यामुळे या आरोपीचा या गुन्ह्याकामी पोलीस कोठडी देण्याचा काहीही संबंध येत नाही. पुढे त्या असेही सांगतात की, तथाकथीत आत्महत्या चिठ्ठी अद्यापपावेतो सिद्ध झालेली नाही. त्यामुळे त्याच्या आधारावर झालेल्या तपास कामाला काहीही अर्थ नाही. त्यामुळे आरोपी क्र. २ ला न्यायालयीन कोठडी देण्याची त्या विनंती करतात.

१२. आरोपी क्र. २ च्या वरील युक्तीवादासाठी तपासी अंमलदार उत्तर देतात की, मयताला थोडीच रक्कम मिळालेली आहे. संपूर्ण रक्कम मिळालेली नाही. यावर प्रतिउत्तर देताना आरोपी क्र.२ तर्फे सांगण्यात येते की, त्यांनी संपूर्ण रक्कम अदा केल्याबाबतचे धनादेशाबाबतचे पुरावे त्यांच्याकडे आहेत.

१३. आरोपी क्र. ०३ तर्फे वकील श्री. विजय अगरवाल यांनी दृकश्राव्य माध्यमातून पुढील कायदेशीर मुद्यांवर प्रहार करुन युक्तीवाद केला की, आरोपीविरुद्धचा तथाकथीत खटला, प्रथम माहिती अहवाल व अटकेसाठी अवलंबण्यात आलेली प्रक्रिया हीच मूळात कायद्याला धरुन नाही. प्रथम माहिती अहवालावर बोट ठेवून ते युक्तीवाद करतात की, त्यात खाडाखोड करुन भारतीय

दंड विधान कलम ३०६ च्या पुढे कलम ३४ हे वितारती हाताने लिहीले आहे. वास्तविक एकदा 'अ' फायनल अहवाल दाखल झाल्यानंतर व तो न्यायालयाच्या आदेशानुसार स्वीकारल्यानंतर पोलीसांना या प्रकरणात तपास करण्याचा कोणताही कायदेशीर अधिकार राहात नाही, असे ते म्हणतात. भारतीय पुरावा कायदा कलम १० नुसार अभियोग पक्षाने आणलेली केस मूळातच पोकळ आहे. तथाकथीत आरोपांनुसार मयताच्या मृत्युनंतर आरोपी एकमेकांना भेटल्याचे कथन दिसते. परंतु कायद्यानुसार घटनेपूर्वी घडलेल्या बाबी लक्षात घेणे आवश्यक आहे असेही ते म्हणतात. आरोपींना अटक करून त्यांची पोलीस कोठडी मागण्यापूर्वी तपास यंत्रणेने हे सिद्ध करणे आवश्यक आहे की, घटनेपूर्वी आरोपीची एकत्रितपणे चर्चा होवून गुन्ह्याबाबत एकमत झाल्यानंतर त्यांनी एकदिलाने व समान हेतूने घटना घडवून आणलेली आहे. परंतु अशा प्रकारची कोणतीही बाब तपास यंत्रणेने समोर आणलेली नाही. मूळातच सदरच्या घटनेबाबत फौजदारी खटला दाखल होवू शकत नाही, त्याबाबत केवळ दिवाणी दावा करता येतो.

१४. आरोपी क्र. ३ तर्फे वकील श्री. अग्रवाल यांनी सुद्धा त्यांची हरकत कायम ठेवून (under protest) पैसे जमा करण्याची हमी युक्तीवादात दिलेली आहे. ते पुढे म्हणतात की, आरोपीने यापूर्वी तपासकामात सहकार्य केलेले आहे. आता पुन्हा त्याला अटक करण्याची आवश्यकता नाही. भारतीय दंड विधानाच्या ज्या कलम ३०६ साठी आरोपींना अटक करण्यात आलेली आहे ते कलमच मूळात लागू होत नाही. त्यासाठी ते म्हणतात की, हे कलम लागू होण्यासाठी आरोपींकडून असे सकारात्मक कृत्य घडले पाहिजे जेणेकरून मयताला आत्महत्येसाठी भाग पडावे लागेल. परंतु समोर असलेल्या पुराव्यावरून आरोपींनी केलेल्या कुठल्याही सकारात्मक कृत्याच्या आधारे मयतला आत्महत्येसाठी भाग पाडले असे समोर येत नाही. त्यामुळे मयताच्या आत्महत्येसाठी या आरोपीला जबाबदार धरता येणार नाही. म्हणून त्याला कायद्याने पोलीस कोठडी देता येणार नाही, असे ते म्हणतात.

१५. यावर सहाय्यक सरकारी वकील श्री. महाकाळ व तपासी अंमलदार

04/11/2020

श्री. शेख उत्तर देतात की, त्यांच्याकडे असलेल्या पुराव्यानुसार आरोपी क्र. ०१ ते ०३ ने गुन्हा केल्याचे दिसत आहे. त्यासाठी त्यांनी साक्षीदारांचे जाब जबाब नोंदविले आहेत. आवश्यक तो सर्व कागदोपत्री पुरावा व डिजीटल पुरावा जमा केलेला आहे. या पार्श्वभूमीवर आरोपींची पोलीस कोठडी त्याच कारणासाठी मागितलेली आहे ज्यासाठी आरोपी हेच उत्तरदायी आहेत. ते पुन्हा म्हणतात की, आरोपी क्र. ०१ ते ०३ ची एकत्रितपणे सखोल चौकशी आवश्यक असल्यामुळे त्यांना पोलीस कोठडी देण्यात यावी.

१६. उभय पक्षांचे प्रत्यक्ष व दृकश्राव्य माध्यमाद्वारे युक्तीवाद ऐकले. प्रथम माहिती अहवाल असे दर्शवितो की, तथाकथीत घटना दि. ०५/०५/२०१८ रोजी घडलेली आहे. त्याबाबत गुन्हा नोंदणी क्र. ५९/२०१८ दाखल झाला. त्याबाबत आरोपींविरुद्ध कोणताही सबळ पुरावा आढळून न आल्याने दि. १६/०४/२०१९ रोजी 'अ' समरी अहवाल सादर होवून तो न्यायालयाने मंजूर केलेला आहे. सदरचा अहवाल हा आजपावेतो फिर्यादी किंवा अन्य कोणीही आव्हानीत केलेला नाही तसेच तो मा. वरीष्ठ न्यायालयाने रद्दबातल ठरविलेला नाही. सबब, सदरचा गुन्हा नोंदणी क्र. ५९/२०१८ चा 'अ' समरी अहवाल आजतागायत अस्तित्वात आहे. या अहवालाला धक्का न लावता तपासी अंमलदार श्री. शेख यांनी तथाकथीत दि. ०५/०५/२०१८ रोजीच्या घटनेबाबत नव्याने तपास सुरु केला. त्यासाठी तपासी अंमलदार श्री. शेख यांनी न्यायालयाची परवानगी घेतल्याचे दिसत नाही. दि. १५/१०/2020 रोजीच्या त्यांच्या अर्जावरुन असे दिसते की, त्यांनी न्यायालयाला केवळ फौजदारी प्रक्रिया संहीता कलम १७३-८ प्रमाणे पुढील तपास सुरु केल्याबाबतचा अहवाल सादर केलेला आहे. सदरच्या तपासकामात त्यांना आदेश प्राप्त झाल्याचे त्यांनी अहवालात नमूद केलेले आहे. सदरचा अहवाल न्यायालयाने केवळ पाहून दाखल करुन घेतलेला आहे. या अहवालावरुन कुठेही न्यायालयाची परवानगी घेतल्याचे दिसून येत नाही.

१७. सदरच्या आजच्या रिमांड अहवालासोबत तपासी अंमलदार श्री. शेख यांनी केस डायरी सुद्धा दाखल केलेली असल्यामुळे त्याबाबत आरोपीतर्फे

उपस्थित करण्यात आलेल्या हरकतीत मला कोणतेही कायदेशीर तथ्य आढळून येत नाही. त्यामुळे मी ती हरकत विचारात घेत नाही.

१८. एकंदरीत आरोपी क्र. ०१ ते ०३ तर्फे पोलीस कोठडीबाबत व अटकेबाबत हरकत उपस्थित करण्याची कारणे लक्षात घेता आरोपींची अटकच बेकायदेशीर असल्याचा सूर दिसतो. कागदपत्रांची काळजीपूर्वक छाननी केली असता तथाकथीत घडलेली घटना, त्यात एकूण झालेला एकूण दोन व्यक्तींचा मृत्यू व या दोन्ही मृत्युंचा आपापसांतील संबंध तसेच या आरोपींशी असणारा संबंध सर्वप्रथम पोलीस कोठडी मागण्यापूर्वी प्रस्थापित व्हायला हवा. तथाकथीत घटनांची श्रृंखला ही अखंडीत राहीली तरच घटना व आरोपी यांचा संबंध लावून आरोपीची पोलीस कोठडी नियमित करता येईल. युक्तीवादासाठी असे गृहीत धरले की, आरोपी क्र. ०१ ते ०३ कडून पैसे येणे बाकी होते त्याबाबत मयत अन्वय नाईक यांच्याकडे घेणेकरी म्हणजे इतर कंत्राटदार वगैरे वारंवार तगादा लावत होते तर मयत कुमोदिनी नाईक यांनी आत्महत्या का केली? किंबहुना त्यांनी आत्महत्या केली काय? याबाबतचे कोणतेही योग्य व संयुक्तीक उत्तर अभियोग पक्षातर्फे देण्यात येत नाही. कुमोदिनी नाईक यांच्या मृत्युचे कारण तसेच त्यांचा अन्वय नाईक यांच्या मृत्युशी असणारा संबंध व त्यानंतर या तिन्ही आरोपींचा याच्याशी असणारा संबध ही संपूर्ण साखळी अखंडपणे प्रस्थापित होत नाही.

१९. या पूर्वी झालेले तपासकाम कसे अपूर्ण होते? त्यात कशा प्रकारे त्रुटी राहील्या आहेत? व त्या का राहिल्या? याबाबत अभियोग पक्षाकडून कोणतेही सबळ कारण व पुरावा मांडण्यात आलेला नाही. त्यामुळे आरोपी क्र.१ ते ३ बाबतच्या पोलीस कोठडीचे समर्थन करता येत नाही.

२०. आरोपीतर्फे तपासकामावर प्रमुख हल्ला हा चढविण्यात आलेला आहे की, तथाकथीत आत्महत्येपूर्वीची चिठ्ठी सिद्ध झालेली नाही. त्यामुळे त्यावर आधारीत तपास ग्राह्य धरता येणार नाही. याबाबत सदरची आत्महत्येपूर्वीची चिठ्ठी पुराव्यात सिद्ध होणे बाकी आहे, त्यामुळे सध्याच्या पुरावा जमा करण्याच्या टप्प्यावर त्यासाठी विचार करता येणार नाही. त्यामुळे या चिठ्ठीला धरून

04/11/2020

आरोपीतर्फे झालेला युक्तीवाद मी ग्राह्य धरत नाही.

२१.   प्रचलित फौजदारी कायद्यानुसार आरोपीची पोलीस कोठडी मिळविण्यासाठी आरोपीविरुद्ध प्रथमदर्शनी सबळ पुरावा मिळून त्याच्या ताब्यातून महत्वपूर्ण बाबी हस्तगत झाल्या पाहिजेत. पोलीस कोठडीत ज्या मुद्यांवर आरोपींची विचारपूस करण्यासाठी त्यांचा ताबा हवा आहे, त्याबाबत ठोस पुरावा आणला पाहिजे. परंतु आरोपींच्या पोलीस कोठडीसाठी जी कारणे सांगितली आहेत, त्या कारणांमध्ये आरोपींना पोलीस कोठडीत घेवून त्यांना प्रत्यक्ष समोर घेवून शहानिशा करण्यासारखी संयुक्तीक कारणे आढळून येत नाहीत. रिमांड अहवालामध्ये नमूद असणारी सर्व कारणे ही इ-मेल, फोल्डर, रासायनिक प्रयोगशाळेतील अहवाल, विविध प्रकारच्या वर्क ऑर्डर्स, व्हेंडर्सची यादी, नाव पत्ते, बॅंक खाते त्यातील तपशीलवार माहिती, वर्क ऑर्डर, तिनही आरोपींच्या कंपन्या आणि मयताची कंपनी त्यांच्यात झालेले विविध करार, त्याप्रमाणे असणा-या वर्क ऑर्डर, त्याबाबतचे मूल्यमापन, आर्थिक मोबदल्याची झालेली देवाण-घेवाण, विविध डेबीट नोटस्, विविध पत्रव्यवहार, विविध आर्थिक आणि व्यावसायीक व्यवहार या संदर्भातील आहे. सदरची पोलीस कोठडी मागण्याची कारणे पूर्णपणे तांत्रिक व दस्तऐवजांवर आधारीत आहेत. त्यासाठी आरोपींची पोलीस कोठडी कशी काय समर्थनीय आहे याबाबत कोणताही समाधानकारक पुरावा सादर करण्यात आलेला नाही.

२२.   याशिवाय, रिमांड अहवाल तपासता असे आढळून येते की, तिघांपैकी कुठल्याही आरोपीला अटक न करता तपासकाम सुरु होवून फिर्यादी व साक्षीदार यांचे सविस्तर जाब जबाब, फेरजबाब तसेच फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १६४ प्रमाणेचेही जबाब नोंदविण्यात आलेले आहेत. या रिमांड अहवालात असेही नमूद करण्यात आलेले आहे की, सदरचा तपास हा सकारात्मक दृष्ट्या चालू आहे. हे तपासकाम प्रगती पथावर असल्याबाबत तपासी अंमलदार म्हणतात की, एकूण इतर २८ साक्षीदारांना याबाबत नोटीसा देण्यात आलेल्या आहेत त्यापैकी १७ साक्षीदार तपासातकामात हजर झालेले आहेत. मयताचा लॅपटॉप

आणि भ्रमणध्वनी हा न्यायवैज्ञानिक प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविण्यात आलेला आहे. शिवाय मयत तसेच आरोपी यांचे बँकांचे खाते क्रमांक मिळवून त्याबाबतची सविस्तर माहिती घेवून झालेल्या आर्थिक व्यवहारांची तज्ञांकडून पडताळणी सुरु आहे. अशा प्रकारे तपासकाम प्रगतीपथावर असताना आरोपींच्या पोलीस कोठडीची मागणी करणारे समर्थनपर पुरावे उपलब्ध नसताना आरोपींची पोलीस कोठडी देणे संयुक्तीक वाटत नाही.

२३. आरोपी क्र. ०१ ते ०३ तर्फे विद्वान वकीलांनी खालीलप्रमाणे मा. वरीष्ठ न्यायालयाची निकालपत्रे व त्यातील निर्देश दाखल केले आहेत.

01. Euro School Education Trust Vs. Divisional Fee Regulatory Committee, Pune and Ors. Bombay High ? Court Writ Petition No. 7594 of 2017

02. Harshad S. Mehta Vs. C.B.I., 1993, JCC 118, dtd. 01/10/1992.

03. Satyajit Ballubhai Desai and Ors. Vs. State of Gujrat, (2014)14 Supreme Court Cases 434

04. Inderjit Singh Grewal Vs. State of Punjab and Anr., (2011) 12 Supreme Court Cases 588

05. C.B.I. Vs. Anupam J. Kulkarni, S.C. Cri. Appeal Nos. 310-311 of 1992 decided on 08/05/1992

06. Joginder Kumar Vs. State of U.P., S.C. W.P. No. 9 of 1994, decided on 25/04/1994

परंतु मी सविनय नमूद करु इच्छीते की, ज्या ठिकाणी कायद्याची तरतुद नसेल किंवा तरतुदींबाबत संभ्रम निर्माण होत असेल तेथेच मी या निर्देशांचा विचार करीन. कायद्याची तरतुद स्पष्ट असताना मी या निर्देशांचा विचार या अर्जाच्या कामी करत नाही.

२४. मी सुरुवातीला नमूद केल्याप्रमाणे आरोपींकडून काहीही जप्त झालेले नाही. जे काही जप्त करण्यात आलेले आहे ते मयत तसेच फिर्यादीकडून जप्त

04/11/2020

केलेले आहे. तथाकथीत गुन्ह्याची पार्श्वभूमी प्रथमदर्शनी सिद्ध होत नाही तसेच आरोपींच्या पोलीस कोठडीसाठी त्यांचा घटनेशी असणारा संबंध जोडणारी शृंखला सुद्धा प्रथम दर्शनी प्रस्थापित होत नाही. अशा सर्व पार्श्वभूमीवर ज्या घटनेबाबत कोणताही पुरावा आलेला नसल्यामुळे 'अ' समरी अहवाल स्वीकारला जातो. सदरचा अहवाल आजतागायत अस्तित्वात असताना सदरच्या खटल्याबाबत पुन्हा तपास सुरु होतो यासाठी आरोपींची पोलीस कोठडीचे समर्थन करणारे कोणतेही योग्य, संयुक्तीक व कायदेशीर कारण आढळत नाही. शिवाय, तथाकथीत गुन्ह्यासंदर्भात प्रत्येक आरोपीची स्वतंत्र अशी काय भूमिका आहे ते नमूद केलेले नाही. त्या संदर्भात मोघमपणे तपासणे योग्य होणार नाही. मी पुन्हा नमूद करु इच्छीते की, सन २०१८ मध्ये झालेल्या घटनेसंदर्भात कोणताही ठोस पुरावा आला नाही म्हणून 'अ' समरी अहवाल आला असताना प्रस्तुतच्या तिन्ही आरोपींची पोलीस कोठडी द्यावी इतप्पर सबळ कायदेशीर कारण आढळून येत नसल्यामुळे पोलीस कोठडीची मागणी फेटाळणे योग्य राहील. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

## <u>आदेश</u>

आरोपी क्र. ०१ ते ०३ यांना दि. १८/११/२०२० रोजीपर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावण्यात येते.

04/11/2020

अलिबाग.  
दिनांक : **०४/११/२०२०**

**(सौ. सुनयना स. पिंगळे)**  
मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.